# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या परदेशी भारतीयांना राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान आज प्रदान करण्यात येणार आहे.

****

महाकुंभ २०२५ ला समर्पित आकाशवाणीच्या विशेष कुंभवाणी वाहिनीचं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. महाकुंभ जात, पंथ आणि भेदभावाच्या पलिकडे असून, एकतेचा संदेश देत असल्याचं योगी आदित्यनाथ यावेळी म्हणाले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कुंभवाणी या वाहिनीवर आजपासून २६ फेब्रुवारीपर्यंत महाकुंभमेळ्यात होणाऱ्या अमृतस्नानासह सर्व कार्यक्रमांचं थेट प्रसारण केलं जाईल. आकाशवाणीच्या १०३ मेगाहर्टझ लहरींवरून, ‘न्यूज ऑन ए आय आर’ या ॲप वरून, तसंच ‘वेव्ज’ या ओ टी टी मंचावरून कुंभ वाणी चं प्रसारण ऐकता येईल.

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी केली. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरु झाली. या महिन्याच्या १७ तारखेपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, २० तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी पाच फेब्रुवारीला एकाच टप्प्यात मतदान होणार असून, आठ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

एसआयपी म्हणजेच सिस्टीमॅटीक इनव्हेस्टमेंट प्लॅन्स अंतर्गत देशांतर्गत गुंतवणुकीनं डिसेंबर महिन्यात पहिल्यांदाच २६ हजार कोटी रुपयांचा विक्रमी टप्पा ओलांडला आहे. भारतीय म्युच्यूअल फंड संघटनेनं ही आकडेवारी प्रसिद्ध केली. ओपन एडेंड इक्वीटी म्युचलफंड गुंतवणुकीतही वाढ होऊन ती ४१ हजार १५६ कोटी रुपयांपर्यंत पोहचली आहे.

****

बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणासंदर्भात सरकारची भूमिका संशयास्पद असल्याची टीका, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रकरणाला एक महिना झाला असून, आरोपीला कठोर शिक्षा होईल असं सरकारच्या वतीनं वारंवार सांगण्यात येत आहे, मात्र अजूनही एका आरोपीला पकडण्यात आलं नसल्याचं सांगत सरकारचं याकडे लक्ष नसल्याची टीका दानवे यांनी केली.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले इथं आयोजित कळस कृषी आणि डेअरी प्रदर्शनाचं राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते काल उद्घाटन झालं. शेतकऱ्यांचं प्रबोधन करण्यासाठी स्थानिक युवकांनी एकत्र येत तालुका पातळीवर कृषी प्रदर्शन भरवण्याची गरज आहे, अशा प्रदर्शनांना शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य केलं जाईल, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. कृषी विभागाच्या योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यात मिळाला पाहिजे यावर शासनाचा भर आहे, योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आली पाहिजे यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याचं कोकाटे यांनी सांगितलं.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात पदवी घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी येत्या सात फेब्रुवारीपर्यंत परीक्षा विभागात आवेदनपत्र दाखल करण्याचं आवाहन विद्यापीठ प्रशासनानं केलं आहे. विद्यापीठाचा ६५ वा दीक्षांत समारंभ येत्या २२ फेब्रुवारीला होणार आहे. गेल्या शैक्षणिक वर्षात पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी, पदव्यूत्तर पदवी या समारंभात प्रदान करण्यात येतील. १४ जून २०२४ ते ८ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान शोधप्रबंध पूर्ण करून, पीएच.डी प्राप्त करणारे संशोधकही या सोहळ्यात पदवी घेण्यासाठी आवेदन

दाखल करू शकतात, असं विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ.भारती गवळी यांनी सांगितलं आहे.

****

एमजीएम अभिमत विद्यापीठाच्या महागामी गुरुकुलाच्या वतीनं १७ ते २० जानेवारी दरम्यान शार्ङ्गदेव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात गायन, वादन आणि नृत्याच्या सादरीकरणासह कलांवतांचं विशेष व्याख्यान आणि कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. महोत्सवाचं हे १६ वं वर्ष आहे.

****

नवी दिल्लीमध्ये येत्या १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातल्या पाच तर महिला संघात तीन खो-खोपटूंची निवड झाली आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी पुण्याचा प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी पुण्याचीच प्रियंका इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघात तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना राजकोट इथं सुरू असून, आयर्लंडच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा आयर्लंड संघाच्या चार बाद १२४ धावा झाल्या होत्या.

****